Original Article
ISSN (Online): 2582-7472

ShodhKosh: Journal of Visual and Performing Arts
June 2024 5(6), 3254–3258

# A CLINICAL STUDY OF AGGRESSION AND GENERAL MENTAL AWARENESS OF VOLLEYBALL PLAYERS REPRESENTED AT THE INTER-UNIVERSITY LEVEL

# आंतर विद्यापीठ स्तरावर प्रतिनिधित्व केलेल्या व्हॉलीबॉल खेळणाऱ्या खेळाडूंच्या आक्रमकता व सामान्य मानसिक जागरूकतेचा चिकित्सक अभ्यास

Amitkumar Prabhakar Khandekar [1], Raju Mahadev Raut [1]

[1] Jyotiba College of Physical Education, Hingna Road, Nagpur-440019, India

**Corresponding Author**
Amitkumar Prabhakar Khandekar,
amitkumar20@gmail.com

**DOI**
10.29121/shodhkosh.v5.i6.2024.6233

**Funding:** This research received no specific grant from any funding agency in the public, commercial, or not-for-profit sectors.

**Copyright:** © 2024 The Author(s). This work is licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.

With the license CC-BY, authors retain the copyright, allowing anyone to download, reuse, re-print, modify, distribute, and/or copy their contribution. The work must be properly attributed to its author.

## ABSTRACT

**English:** Volleyball is a high-intensity, fast-paced sport that requires players to make quick decisions, perform technical skills accurately, and work efficiently with teammates. This puts players under a great deal of physical and mental stress while playing. This stress negatively impacts their performance. Mental stress affects their confidence and coordination of physical movements. Their decision-making ability is impaired due to increased aggression and anxiety while making important decisions during the competition. To perform successfully, volleyball players need to consistently deliver accurate serves, fast defensive play, and timely decision-making in a fast-paced and high-pressure competitive environment.

**Hindi:** व्हॉलीबॉल हा एक उच्च तीव्रतेचा, वेगवान खेळ आहे ज्यामध्ये खेळाडूंना त्वरित निर्णय घेणे, तांत्रिक कौशल्ये अचूकपणे सादर करणे आणि संघातील सहकाऱ्यांसोबत कार्यक्षमतेने काम करणे आवश्यक असते. यामुळे खेळाडूंवर खेळतांना मोठ्याा प्रमाणात शारीरिक आणि मानसिक दडपणाला सामोरे जावे लागते. या तणावाचा त्यांच्या कामगिरीवर नकारात्मक परिणाम होतो. मानसिक तणावामुळे त्यांचा आत्मविश्वास व षारीरिक हालचालींच्या समन्वयावर प्रभाव पडतो. स्पर्धेदरम्यान महत्त्वाचे निर्णय घेतांना त्यांची आक्रमकता व चिंता वाढल्यामुळे त्यांची निर्णय घेण्याची क्षमता कमी होते. यशस्वी कामगिरीसाठी व्हॉलीबॉल खेळाडूंना सातत्याने अचूक सव्हिस, जलद बचावात्मक खेळ आणि गतिमान आणि उच्च-दाब स्पर्धा वातावरणात वेळेवर निर्णय घेणे आवश्यक असते

## 1. प्रस्तावना

व्हॉलीबॉल हा एक उच्च तीव्रतेचा, वेगवान खेळ आहे ज्यामध्ये खेळाडूंना त्वरित निर्णय घेणे, तांत्रिक कौशल्ये अचूकपणे सादर करणे आणि संघातील सहकाऱ्यांसोबत कार्यक्षमतेने काम करणे आवश्यक असते. यामुळे खेळाडूंवर खेळतांना मोठ्या प्रमाणात शारीरिक आणि मानसिक दडपणाला सामोरे जावे लागते. या तणावाचा त्यांच्या कामगिरीवर नकारात्मक परिणाम होतो. मानसिक तणावामुळे त्यांचा आत्मविश्वास व शारीरिक हालचालींच्या समन्वयावर प्रभाव पडतो. स्पर्धेदरम्यान महत्त्वाचे निर्णय घेतांना त्यांची आक्रमकता व चिंता वाढल्यामुळे त्यांची निर्णय घेण्याची क्षमता कमी होते. महत्त्वाचे निर्णय घेतांना त्यांची आक्रमकता व चिंता वाढल्यामुळे त्यांची निर्णय घेण्याची क्षमता कमी होते. उच्च—दाब स्पर्धा वातावरणात वेळेवर निर्णय घेणे आवश्यक असते. साधारणतः क्रीडाक्षेत्रात आक्रमकता दोन स्वरूपात निदर्शनास येते, ज्यामध्ये अनियंत्रित आक्रमकता, किंवा नियंत्रित आणि ध्येय—केंद्रित आक्रमकता जी स्पर्धात्मक कामगिरीला चालना देते. अनियंत्रित आक्रमकता, किंवा अस्थिर आणि भावनिकदृष्ट्या निर्माण झालेली कृती

कामगिरीत अडथळा आणते, यावरून असे दिसून येते की योग्यरित्या लागू केल्यावर, नियंत्रित आक्रमकता खेळाडूंची स्पर्धात्मक प्रेरणा, आणि रणनीतिक वर्चस्व वाढवते जेणेकरून अधिक अनुकूल खेळ करणे व्हॉलीबॉल खेळाडूला शक्य होईल. व्हॉलीबॉलसारख्या गतीशील खेळात, जिथे तात्काळ प्रतिक्रिया आणि सांघिक कार्य महत्त्वाचे असते, स्पर्धात्मक चिंता आणि आक्रमकता नियंत्रित करण्याची क्षमता व्हॉलीबॉल खेळाडूच्या कामगिरीसाठी महत्त्वाची होते. व्हॉलीबॉल खेळात विशिष्ट कार्यांसाठी मानसिक कौशल्य प्रशिक्षण पद्धती लागू करण्याकरीता प्रशिक्षक मानसिक—कंडिशनिंग कार्यक्रमांच्या गरजेवर भर देतात. शिवाय, सध्याच्या प्रशिक्षण पद्धती खेळाडूंच्या वैयक्तिकृत चिंताग्रस्त आणि आक्रमक व्यवस्थापन दृष्टिकोनांकडे प्रगती करत आहेत कारण खेळाडूंमध्ये मानसिक वैशिष्ट्ये, खेळण्याच्या स्थिती आणि अनुभवाच्या पातळीनुसार योग्य मानसिक स्थिती नसू शकते ज्यामुळे व्हॉलीबॉल प्रशिक्षण प्रणालींमध्ये बायोफीडबॅक प्रशिक्षण, माइंडफुलनेस तंत्रे आणि व्हिज्युअलायझेशन व्यायामांचा समावेश झाला आहे. वरील बाबींचा विचार करून प्रस्तुत संशोधनकार्यात खेळात शाश्वत लक्ष केंद्रित करणे, अनुकूल निर्णय घेणे आणि प्रभावी अंमलबजावणीला प्रोत्साहन देणे जेणेकरून चिंता, आक्रमकता आणि व्हॉलीबॉल कामगिरीच्या जटिल संबंधांच्या भविष्यातील अनुभवजन्य तपासांवर भर देणे शक्य होणे आवश्यक आहे. व्हॉलीबॉलमध्ये, आक्रमकता प्रभावीपणे व्यवस्थापित केली तर ती कामगिरी वाढवणारी सकारात्मक शक्ती असू शकते. तथापि, जास्त किंवा कमी प्रमाणात व्यवस्थापित केलेली आक्रमकता मानसिक आरोग्य आणि संघाच्या गतिशीलतेवर नकारात्मक परिणाम करू शकते. या बाबींचा विचार करून प्रस्तुत संशोधनकार्यात विद्यापीठ स्तरावर व्हॉलीबॉल खेळणाऱ्या खेळाडूंच्या विविध प्रकारच्या आक्रमकता व सामान्य मानसिक जागरूकतेचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे.

## 2. संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनात मुख्यत: सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला व संशोधन क्षेत्र म्हणुन महाराष्ट्र राज्याची निवड करण्यात आली. प्रस्तूत अध्ययनात महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांचा अध्ययन विश्व म्हणून विचार करण्यात आला परंतु, संशोधन करण्यासाठी संशोधन क्षेत्र म्हणून राज्यातील निवडक विद्यापीठांचा विचार करण्यात आला असुन या विद्यापीठातील आंतर विद्यापीठ स्तरावर खेळणाऱ्या सर्व व्हॉलीबॉल खेळाडूंचा जनसंख्या म्हणुन विचार करण्यात आला. गैर संभाव्यता पद्धतीतील सहेतुक किंवा उद्देश्यपूर्ण पद्धतीचा अवलंब करून नमुना निवडण्यात आला. या संशोधनकार्यात तथ्य संकलनाकरीता महाराष्ट्रातील आंतर विद्यापीठ स्तरावर खेळणाऱ्या एकुण ११५ व्हॉलीबॉल खेळाडूंची नमूना म्हणून निवड करण्यात आली. तथ्यांचे योग्य संकलन व विश्लेषण यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडयाची निवड करण्यात आली होती. या संशोधनकार्यात माहिती संकलित करण्याकरिता प्रमाणीकृत पद्धतीचा वापर करण्यात आला. व्हॉलीबॉल खेळाडूंच्या आक्रमकतेचा त्यांच्या क्रीडा प्रदर्शपसवरील प्रभावाचे मापन करण्याकरीता डॉ. एम. के. सुल्तानीया यांची ॲग्रेशन इन्व्हेंटरीचा वापर करण्यात आला. तथ्यांचे विश्लेषण करण्याकरीता सांख्यकीय तंत्रातील वारंवारीता व बहुलक चाचणींचा उपयोग करण्यात आला. अभ्यासातील विविध घटक, पडताळण्याकरीता व संशोधनाचा आराखडा लक्षात घेता व्हॉलीबॉल खेळाडूंच्या आक्रमकता व सामान्य मानसिक जागरूकतेचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी काई वर्ग मूल्य सांख्यिकीय चाचणीचा वापर करण्यात आला. संभाव्यता पातळी ०.०५ निर्धारीत करण्यात आली व वरील सर्व प्रक्रियानंतर प्राप्त झालेले निष्कर्ष जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ कसे राहतील याची दखल घेण्यात आली.

## 3. सांख्यिकीय विश्लेषण व संशोधनाचे परिणाम

### 3.1. आक्रमकता — हिंसकता घटक

**सारणी क्र. 1** आंतर विद्यापीठ स्तरावर खेळणाऱ्या व्हॉलीबॉल खेळाडूंच्या हिंसक—आक्रमकतेचा स्तर याबाबत माहिती

| स्तर | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| अत्यल्प | ७९ | ५८.५ |
| मध्यम/सरासरी | ५२ | ३८.५ |
| उच्च | ४ | ३.० |
| एकूण | १३५ | १००.० |

काई—वर्गमूल्यः ६४.१३३य स्वातंत्र्यांश:२य तालिका मूल्यः ५.९९य च मूल्य:ढ०.०५

वरील सारणी क्रमांक १ मध्ये महाराष्ट्र राज्यातील आंतर विद्यापीठ स्तरावर खेळणाऱ्या व्हॉलीबॉल खेळाडूंचा आक्रमकतेचा—हिंसक घटकाचा स्तर याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सांख्यिकीय विश्लेषणानंतर प्राप्त परिणामांनुसार ५८.५ टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंचा आक्रमकतेचा—हिंसक घटकाचा स्तर अत्यल्प असून ३८.५ टक्के खेळाडूंचा स्तर मध्यम/सरासरी असल्याचे आढळले. तसेच ३.० टक्के खेळाडूंचा आक्रमकतेचा—हिंसक घटकाचा स्तर उच्च असल्याचे निदर्शनास आले.

## 3.2. आक्रमकता — संशय घटक

**सारणी क्र.** 2 आंतर विद्यापीठ स्तरावर खेळणाऱ्या व्हॉलीबॉल खेळाडूंच्या संशय आक्रमकतेचा स्तर याबाबत माहिती

| स्तर | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| अत्यल्प | ३१ | २३.० |
| मध्यम/सरासरी | ६७ | ४९.६ |
| उच्च | ३७ | २७.४ |
| एकूण | १३५ | १००.० |

काई—वर्गमूल्यः १६.५३३य स्वातंत्र्यांशः२य तालिका मूल्यः ५.९९य च मूल्यःढ०.०५

वरील सारणी क्रमांक २ मध्ये महाराष्ट्र राज्यातील आंतर विद्यापीठ स्तरावर खेळणाऱ्या व्हॉलीबॉल खेळाडूंचा आक्रमकतेचा संशय घटकाचा स्तर याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सांख्यिकीय विश्लेषणानंतर प्राप्त परिणामांनुसार २३.० टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंचा आक्रमकतेचा संशय घटकाचा स्तर अत्यल्प असून ४९.६ टक्के खेळाडूंचा स्तर मध्यम/सरासरी असल्याचे आढळले. तसेच २७.४ टक्के खेळाडूंचा संशय आक्रमकतेचा संशय घटकाचा स्तर उच्च असल्याचे निदर्शनास आले.

## 3.3. आक्रमकता— अपराध भावना घटक

**सारणी क्र.** 3 आंतर विद्यापीठ स्तरावर खेळणाऱ्या व्हॉलीबॉल खेळाडूंच्या अपराध भावना आक्रमकतेचा स्तर याबाबत माहिती

| स्तर | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| अत्यल्प | ६६ | ४८.९ |
| मध्यम/सरासरी | ५२ | ३८.५ |
| उच्च | १७ | १२.६ |
| एकूण | १३५ | १००.० |

काई—वर्गमूल्यः २८.३११य स्वातंत्र्यांशः२य तालिका मूल्यः ५.९९य च मूल्यःढ०.०५

आक्रमकतेचा अपराध भावना घटकाचा स्तर याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सांख्यिकीय विश्लेषणानंतर प्राप्त परिणामांनुसार ४८.९ टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंच्या आक्रमकतेचा अपराध भावना घटकाचा स्तर अत्यल्प असून ३८.५ परिणामांनुसार ४८.९ टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंच्या आक्रमकतेचा अपराध भावना घटकाचा स्तर अत्यल्प असून ३८.५ वरील सारणी क्रमांक ३ मध्ये महाराष्ट्र राज्यातील आंतर विद्यापीठ स्तरावर खेळणाऱ्या व्हॉलीबॉल खेळाडूंच्या टक्के खेळाडूंचा स्तर मध्यम/सरासरी असल्याचे आढळले. तसेच १२.६ टक्के खेळाडूंच्या आक्रमकतेचा अपराध भावना घटकाचा स्तर उच्च असल्याचे निदर्शनास आले.

## 3.4. आक्रमकता— सर्वकष

**सारणी क्र.** 4 आंतर विद्यापीठ स्तरावर खेळणाऱ्या व्हॉलीबॉल खेळाडूंच्या सर्वकष आक्रमकतेचा स्तर याबाबत माहिती

| स्तर | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| अत्यल्प | ४१ | ३०.४ |
| मध्यम/सरासरी | ६७ | ४९.६ |
| उच्च | २७ | २०.० |
| एकूण | १३५ | १००.० |

काई—वर्गमूल्यः १८.३११य स्वातंत्र्यांशः२य तालिका मूल्यः ५.९९य च मूल्यःढ०.०५

वरील सारणी क्रमांक ४ मध्ये महाराष्ट्र राज्यातील आंतर विद्यापीठ स्तरावर खेळणाऱ्या व्हॉलीबॉल खेळाडूंचा सर्वकष आक्रमकतेचा स्तर याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सांख्यिकीय विश्लेषणानंतर प्राप्त परिणामांनुसार ३०.४ टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंचा सर्वकष आक्रमकतेचा स्तर अत्यल्प असून ४९.६ टक्के खेळाडूंचा स्तर मध्यम/सरासरी असल्याचे आढळले. तसेच २०.० टक्के खेळाडूंचा सर्वकष आक्रमकतेचा स्तर उच्च असल्याचे निदर्शनास आले.

## 3.5. सामान्य मानसिक जागरूकता

**सारणी क्र. 5** आंतर विद्यापीठ स्तरावर खेळणाऱ्या व्हॉलीबॉल खेळाडूंची सामान्य मानसिक जागरूकतेचा स्तर याबाबत माहिती

| स्तर | संख्या | टककेवारी |
|---|---|---|
| उत्कृष्ट | १०५ | ७७.८ |
| सरासरी | १९ | १४.१ |
| सरासरी पेक्षा कमी | ८ | ५.९ |
| अत्यल्प | ३ | २.२ |
| एकूण | १३५ | १००.० |

काई—वर्गमूल्यः २०४.५२६य स्वातंत्र्यांशः३य तालिका मूल्यः ७.८२य च मूल्यःढ०.०५

वरील सारणी क्रमांक ५ मध्ये महाराष्ट्र राज्यातील आंतर विद्यापीठ स्तरावर खेळणाऱ्या व्हॉलीबॉल खेळाडूंच्या सामान्य मानसिक जागरूकतेचा स्तर याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सांख्यिकीय विश्लेषणानंतर प्राप्त परिणामांनुसार ७७.८ टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंच्या सामान्य मानसिक जागरूकतेचा स्तर उत्कृष्ट असून १४.१ टक्के खेळाडूंचा सरासरी तर ५.९ टक्के खेळाडूंचा स्तर सरासरी पेेक्षा कमी असल्याचे आढळले. तसेच २.२ टक्के खेळाडूंचा सामान्य मानसिक जागरूकतेचा स्तर अत्यल्प असल्याचे निदर्शनास आले.

# 4. निष्कर्ष

## 4.1. आक्रमकता — हिंसकता घटक

- प्राप्त परिणामांच्या आधारे असे निदर्शनास येते की, संशोधन क्षेत्रातील बहुतांश (ढ०.०५) व्हॉलीबॉल खेळाडूंचा आक्रमकतेचा हिंसक घटकाचा स्तर अत्यल्प आहे.

## 4.2. आक्रमकता — संशय घटक

- प्राप्त परिणामांच्या आधारे असे निदर्शनास येते की, संशोधन क्षेत्रातील बहुतांश (ढ०.०५) व्हॉलीबॉल खेळाडूंचा आक्रमकतेचा संशय घटकाचा स्तर मध्यम/सरासरी आहे.

## 4.3. आक्रमकता— अपराध भावना घटक

- प्राप्त परिणामांच्या आधारे असे निदर्शनास येते की, संशोधन क्षेत्रातील बहुतांश (ढ०.०५) व्हॉलीबॉल खेळाडूंच्या आक्रमकतेचा अपराध भावना घटकाचा स्तर अत्यल्प आहे.

## 4.4. आक्रमकता— सर्वकष

- प्राप्त परिणामांच्या आधारे असे निदर्शनास येते की, संशोधन क्षेत्रातील बहुतांश (ढ०.०५) व्हॉलीबॉल खेळाडूंचा सर्वकष आक्रमकतेचा स्तर मध्यम/सरासरी आहे.

## 4.5. सामान्य मानसिक जागरूकता

- प्राप्त परिणामांच्या आधारे असे निदर्शनास येते की, संशोधन क्षेत्रातील बहुतांश (ढ०.०५) व्हॉलीबॉल खेळाडूंचा सामान्य मानसिक जागरूतेचा स्तर उत्कृष्ट आहे.

## संदर्भ ग्रंथ

कोठीवाले, द.ब.,(१९६७), शारीरिक शिक्षणाचा विकास, भाग १, श्रीलेखन व वाचनभांडार, रस्ता पुणे २ मुद्रक श्री द.वा. आंबेकर, आर्यभूषण मुद्रणालय ९१५/१, शिवाजीनगर, पुणे, पृ.क्र.२३.

कुंडले एम.बि.,(१९९०),‘शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक मानसशास्त्र', श्री विद्या प्रकाशन,रविवार पेठ, पुणे, पृ.क्र. ६.

गोडबोले मा.स., प्रा. सौ. गाडगीळ स्वामी, ‘शारीरिक शिक्षण' प्रकाशक—पुष्पा पुसावकर, व्यवस्थापक सुविचार प्रकाशन मंडळ पुणे, ४६१/४ सदाशिव पेठ, पुणे ३०, पृ.क्र. ९.

पाल द्रे., (१९९७), शारीरिक शिक्षकत्व एवं इतिहास व समस्त खेल मैदान एवं नियम, प्रथम संस्करण, फ्रेन्डस पब्लिकेशन, पृ.क्र.२

Ates, H. (2023). Examination of narcissistic personality traits of volleyball players according to some variables, Revista De Gestão E Secretariado, 14(10), pp. 17646–17657.

Kumar, D. (2016) Aggression among different playing positions in national field Hockey, International Journal of Applied Research.

Praveen (2015). An Impact of Aggression on Sports Performance International Journal of Applied Research, 1(7), pp. 763-765.

Seydioğlu, C., Yağci, I and Uğur, E. (2023). A Study on The Aggression Levels Of Athletes Involved in E-Sports nnd Traditional Sports, Beden Eğitimi Spor Sağlık Ve Efor Dergisi, 2(3), pp. 291–302.